# विद्यापीठ परीक्षा शासन आदेशानंतरच

**कोल्हापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३ मेपर्यंत लॉकडाऊन वाढविल्याचे जाहीर केल्यानंतर विद्यापीठाच्या सर्व परीक्षा या केंद्र शासनाचा आदेश आल्यानंतरच घेण्यात येणार आहेत, असे स्पष्टीकरण कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिले. लॉकडाऊननंतर विद्यापीठाने नियोजित परीक्षेचे वेळापत्रक रद्द केले आहे. १४ एप्रिलनंतर परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करणार अशा सूचनाही दिल्या होत्या. पण लॉकडाऊन वाढवल्याने परीक्षा कधी घ्यायच्या यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी सहा सदस्यांची समिती नेमली आहे. या समितीची एक बैठकही झाली आहे. ही समिती राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांचा अभ्यास करून राज्य शासनाला अहवाल सादर करणार आहे. देशभरातील सर्वच विद्यापीठांचा अभ्यास करण्यासाठी युजीसीनेही एक समिती नेमली आहे. त्यामुळे केंद्र शासन जे आदेश देईल ते आदेश देशातील सर्वच विद्यापीठांना लागू होणार आहेत. केंद्र शासन जोपर्यंत पुढील आदेश देत नाही तोपर्यंत विद्यापीठातील कोणतीच परीक्षा घेतली जाणार नाही.

# ॲकॅडेमिक कामास प्राधान्य

## डॉ. पी. डी. राऊत यांचा पुस्तके, शोधप्रबंध वाचनावरही भर

### » संचारबंदीतले दिवस

**प्रा. डॉ. पी. डी. राऊत शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख. येत्या जुलैमध्ये ते सेवानिवृत्त होतील. खास शिवाजी पेठेतलं हे व्यक्तिमत्त्व. यांचे वडील फोटो आर्टिस्ट. मुलांच्या शिक्षणात त्यांनी तडजोड केली नाही. परिणामी डॉ. राऊत यांनी अध्ययनात कसूर केली नाही. बी. एस्सी. प्राणिशास्त्र विषयातून झाल्यानंतर त्यांच्या करिअरचं क्षितीज विस्तारलं. मध्यमवर्गीय कुटुंबात शिक्षणाचा प्रकाश फैलावला. विद्यापीठात रुजू झाल्यानंतरही त्यांच्या कामाचा आवाका मोठा राहिलाय. संचारबंदीत त्यांचं काम सुरूच आहे. ॲकॅडेमिक कामाला त्यांचं नेहमीच प्राधान्य राहिलंय.**

**- संदीप खांडेकर**



कामात व्यस्त असलेले प्रा. डॉ. पी. डी. राऊत.

डॉ. राऊत यांचा दत्ताजी शेळके विद्यालय, महाराष्ट्र हायस्कूल, न्यू कॉलेज ते राजाराम महाविद्यालय शिक्षण प्रवास राहिला. शालेय जीवनापासूनच पहाटे उठण्याची सवय. त्यात आजतागायत खंड नाही. संचारबंदीत कामाचा निपटारा करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. पहाटे पाचला उठल्यानंतर हलका व्यायाम चुकत नाही. जगभरातील घडामोडी जाणून घेण्यासाठी सकाळी तासभर मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांच्या वाचनासाठीचा वेळ त्यांचा राखीव असतो.

त्यांचा वाचनाचा आवाका भलताच आहे. हाती पडेल ते पुस्तक ते वाचून काढतात. संचारबंदीत त्यांच्या हाती जे. आर. डी. टाटा यांचे 'लेटर्स बाय टाटा,' डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे 'रिइन्व्हेंटिंग इंडिया,' ज्ञानेश्वर मुळे यांचे 'माती, पंख आणि आकाश' ही पुस्तके आहेत. सकाळचा नाश्ता आवरला की, ही पुस्तके त्यांच्या हातात अलगद येतात. संचारबंदीत त्यांचे वर्क फ्रॉम् होम सुरू आहे. पाणी, हवा व ध्वनिप्रदूषणाच्या मोजमापासाठी विद्यापीठात त्यांचं जाणं नित्याचं आहे. संशोधक विद्यार्थ्यांना हाताशी घेऊन प्रदूषणाचे मूल्यमापन करण्यात ते व्यस्त आहेत.

ते मुंबईतल्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये एक तप होते. विज्ञान संस्थेत त्यांनी दहा वर्षे काम केले. ते २००५ मध्ये शिवाजी विद्यापीठात प्रपाठक म्हणून रुजू झाले. या कालावधीत यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थ्यांनी पीएचडी मिळविल्या. आजही त्यांच्याकडे संशोधक विद्यार्थी मार्गदर्शन घेत आहेत. त्यांच्या शोध प्रबंधाचे वाचन त्यांच्याकडून सुरू आहे. चित्रपट पाहण्यात त्यांचे मन रमत नाही. करमणुकीच्या मालिका पाहणे त्यांना आवडते. विद्यापीठातील काम आटोपल्यानंतर वाचन व मनोरंजनात्मक कार्यक्रम पाहण्यात त्यांचा वेळ जातो.

त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुमारे ९४ शोधप्रबंध सादर झाले आहेत. जुलैमध्ये ते सेवानिवृत्त होणार असल्याने त्यात आणखी भर पडण्यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू आहे. त्याकरिता पर्यावरणशास्त्र अधिविभागातील केबिनमध्ये त्यांचं पेपरवर्क सुरू आहे. सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग राहिला आहे. काहिलीत गणेशमूर्ती विसर्जन उपक्रमात ते कोटीतीर्थ तलावावर हमखास हजर असतात. सेवानिवृत्तीनंतर संशोधन आणि सामाजिक उपक्रमातील सहभाग कायम राहील, असं ते आवर्जून सांगतात.

(समाप्त)

# स्वच्छ हवा अन् ऑर्किडची गतीने वाढणारी फुले...!

## व्हॅन्डा ऑर्किडची प्रजाती : हवा प्रदूषण 'इंडिकेटर' म्हणून ऑर्किड उपयुक्त

**अमोल सावंत** : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : शहरातील हवेचे प्रदूषण जास्त आहे की कमी हे सांगण्याचे काम ही ऑर्किडस् करतात. ऑर्किडस्ला प्रदूषण इंडिकेटर म्हणून ओळखले जाते. हवेचे प्रदूषण जास्त असेल तर ऑर्किडस् जास्त वाढत नाही. तग धरत नाहीत. आता तर कोरोना लॉकडाउनमुळे शहरातील गल्ली-बोळ, पेठा, रस्ते, चौक शांत आहे. महिनाभरापासून शहरात कसलेही प्रदूषण नाही. परिणामी, शहरात ठिकठिकाणी असलेल्या रेन ट्रीच्या फांद्यांवर ऑर्किडस्चे झुबके गतीने वाढलेले दिसत आहेत. ही ऑर्किडस् शिवाजी पेठ, पद्माराजे गर्ल्स हायस्कूलसमोर, टाऊन हॉल बाग परिसर, ताराबाई पार्क, नागाळा पार्क, अन्यत्र ठिकाणी पाहायला मिळतात. व्हँडाला संस्कृतमध्ये 'वन्दाका' म्हणतात.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने एक महिने शहरातील हवेच्या प्रदूषणाची चाचणी घेतली. त्यानुसार हे प्रदूषण खूप कमी झाल्याच्या नोंदी आहेत. ऑर्किडस् हे अतिशय संवेदनशील असे फुलांचे झुडूप असते. ऑर्किडस्ला सुंदर अशी निळ्या रंगाची फुले येतात. ही फुले बुके करण्यासाठी वापरली जातात. ही फुले अन् बुके खूप महाग असतो. ऑर्किडस्च्या अनेक प्रजाती पश्चिम घाटातील डोंगररांगातील झाडांवर आढळतात. त्यापैकी शहरातील रेन ट्रीमध्ये दिसणारा हा ऑर्किड व्हॅन्डा नावाने ओळखला जातो. कॅमेरा मानस्तंभाजवळ जो मोठा रेन ट्री आहे, तिथे तर प्रचंड मोठ्या आकारात ऑर्किडस्चे जाळे पाहायला मिळते. प्रदूषण कमी झाले की, हे ऑर्किडस् खूप गतीने वाढते.

रेन ट्री, अन्य जाड साली असलेल्या झाडांवर ते दिसते. कोणताही प्राणी, पक्षी या ऑर्किडस्ला हात लावत नाहीत. अनेकजण मात्र बांध (लोरॅन्थस सारखा परजिवी) आहे, म्हणून चुकून ऑर्किडस् काढतात. खरेतर परजिवी वनस्पती अन् ऑर्किडस्मध्ये खूप फरक आहे. विनाकारण कोणीही ऑर्किडस्ला हात लावू नये. आपल्या सुंदर, स्वच्छ अशा कोल्हापूर शहराचा, हवेचा तो इंडिकेटर आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.



**कोल्हापूर : शिवाजी पेठेतील पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या समोरील रेन ट्रीवर वाढलेला ऑर्किडस्.**



शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन.

# डॉ. आंबेडकर यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. सोशल डिस्टन्सिगचे पूर्णतः पालन करत जयंती साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात आंबेडकर जयंती साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात मंगळवारी त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. सोशल डिस्टन्सिंगचे पूर्णत: पालन करत जयंती साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, आदी उपस्थित होते.

लोकमत

# आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेस प्रारंभ

कोल्हापूर : संपूर्ण जग लॉकडाऊन असताना न्यू कॉलेज कोल्हापूर, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी दुसरी आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचा प्रारंभ झाला. त्यामध्ये जगभरातील ४१० जण सहभागी झाले.

'नॅनो बायो २०' या विषयावरील परिषदेत जगभरातील संशोधकांना वर्क फ्रॉम होमची उत्तम संधी प्राप्त झाली आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु देवानंद शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले. परिषदेमध्ये कोरिया, सिंगापूर, तैवान, इंग्लंड, जर्मनी यासह भारतातील विद्यापीठ, शिक्षण संस्थांतून तज्ज्ञ सहभागी झाले आहेत. उद्‌घाटनप्रसंगी प्र-कुलगुरु डी. टी. शिर्के, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. परिषदेचे नियोजन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, दादा पाटील महाविद्यालय कर्जतचे प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, आदींनी केले आहे.

Kolhapur Main
Page No. 13 Apr 15, 2020
Powered by: erelego.com

# फुले यांना अभिवादन

कोल्हापूर : जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. डॉ. विलास नांदवडेकर यावेळी उपस्थित होते.

Kolhapur Main
Page No. 13 Apr 15, 2020
Powered by: erelego.com

प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, आदी उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठ**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते



कोल्हापूर : विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन उपस्थितीत होते.

# पंचगंगा नदी प्रदूषण पाहणीचे दोन टप्पे पूर्ण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे पंचगंगा नदी प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी पाण्याचे नमुने घेतले आहेत. तीन टप्प्यांत ते घेण्यात येणार असून, पैकी दोन टप्पे पूर्ण झाले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संचारबंदी लागू केली आहे. साखर व औद्योगिक कारखाने बंद असून, नदी प्रदुषणास कारणीभूत ठरणारे अन्य छोटे उद्योग व दुकानांचे शटरडाउन आहे. या स्थितीचा फायदा घेत पंचगंगा नदी प्रदूषणाची पातळी किती आहे, याची माहिती पर्यावरणशास्त्र अधिविभाग घेत आहे. विभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पाण्याचे नमुने संशोधक विद्यार्थ्यांनी घेतले.